# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, 10 वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-400 051
दूरध्वनी : 26556799 फॅक्स : 26556805 ई.मेल :collectormsd@gmail.com

---

क्र.: सी/कार्या-2 आय/टे-8/कावि-602/2019
दिनांक : 20 /02/2020 2730

**प्रति,**
मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

**विषय :** मौजे चेबुर ता. कुर्ला सायन-पवनेल हायवे येथे कांदळवनालगत भरणी केल्याबाबतत...

**संदर्भ :** 1. मा. मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष दिनांक 06/08/2019 रोजीच्या ई-मेल संदेशान्वये श्री. नंदकुमार पवार यांची तक्रार.
2. या कार्यालयाकडील पत्र दिनांक 09/09/2019
3. उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगर यांचेकडील अहवाल क्र. उविअ/पु.उ./टे-1/कावि-949/2019 दि. 23/12/2019.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
4617
12/03/2020.
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

Deepesh steno file it. Write a letter to DFO mmcu to remove encroachment
DCF(M)
VP6 13/3

उपरोक्त विषयांकित प्रकरणाबाबत संदर्भ क्र. 1 च्या पत्रान्वये मा. मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांचेकडील दि.06/08/2019 रोजीच्या ई-मेल संदेशान्वये श्री. नंदकुमार पवार यांची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाला असून प्रस्तुत प्रकरणी अर्जदार श्री. नंदकुमार पवार यांनी मौजे चेबुर ता. कुर्ला सायन-पवनेल हायवे येथेकांदळवनालगत भरणी होत असल्याबाबत तक्रार दाखल केली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील संदर्भ क्र. 2 च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगर यांना चौकशी करुन अहवाल सादर करणेकामी कळविले होते. त्यानूसार त्यांनी संदर्भ क्र. 3 च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

मौजे- चेंबूर, तालुका कुर्ला येथील सर्वे नंबर 321 पैकी न. भू. क्रमांक 661 या शासकीय जमिनीवर असलेल्या कांदळवन क्षेत्रात अनधिकृत भराव करून अंदाजे 30 ते 40 कच्च्या झोपड्या बांधलेल्या आहेत. तसेच सदर जागेवर अनधिकृत वाचनाल, गॅरेज दिसून आले. जागेवर अनधिकृत भराव झाल्याने खाडीच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बंद झाला असून नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाअभावी कांदळवनाची झाडे सुकलेल्या अवस्थेत दिसून आली. साचलेल्या पाण्यामुळे देखील कांदळवनाची हानी झालेली आहे. सदर जागेचा पूर्वेस कांदळवन/दलदलीचे क्षेत्र, निवासी सोसायट्या व पश्चिमेस घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, उत्तरेस पूर्व द्रुतगती महामार्ग व दक्षिणेस मानखुर्द लिंक रोड व दलदलीचे क्षेत्र आहे.

सदर स्थळपाहणीवेळी बृहन्मुंबई महानगरपालिका, नगर भूमापन अधिकारी चेंबूर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चेंबूर यांना पत्रव्यवहार करूनही ते स्थळपाहणीसाठी उपस्थित राहिले नाहीत तसेच तक्रारदार ही हजर नव्हते असे नमूद केले आहे.

सर्वे नंबर 320 पैकी चे गाव अभिलेख 7/12 पाहता कब्जेदार सदरी भारत सरकार (साल्ट पॅन) अशी नोंद आहे. सदरचे क्षेत्र हे सॉल्ट पॅनविभागाच्या अखत्यारित येत असल्याने सदर क्षेत्राचे संरक्षण तसेच

अनधिकृत झोपड्या व अनधिकृत भराव करण्यास प्रतिबंध / निर्बंध करण्यास सदर विभागामार्फत उपाययोजना करण्यात याव्यात याबाबत मा. उपायुक्त मिठागरे यांना तहसिलदार कुर्ला यांनी त्यांचेकडील दिनांक 09.12.2019 रोजीच्या पत्रान्वये तसेच शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 19.12.2018 नुसार योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगरे यांचेकडील अहवाल पृष्ट क्र. 01 ते ..... आपले माहितीकरिता सविनय सादर.

( वंदना मकू )
**अपर चिटणीस, मुंबई उपनगर**

स्थळ प्रतिवर मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांची सही असे.

**प्रत : मा. मुख्य वनसरंक्षक, कांदळवल कक्ष यांना माहितीसाठी.**

# उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

निळकंठ बिझनेस पार्क, ए बिल्डींग, सहा मजला, किरोळ रोड, विद्याविहार (पश्चिम), मुंबई-४०००८६

ई मेल-sdoeasternsuburban@gmail.com दुरध्वनी क्रमांक : २५१११११२६


cms/19/39781/का.नि. 31.12.19

क्र. उविअ/पू.उ/टे-१/कावि-९४९/२०१९

दिनांक :- २३.१२.२०१९ जा. क्र. ७८९

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

अ.जि. 23/1/14

विषय : मौजे चेंबूर ता. कुर्ला सायन-पनवेल हायवे येथे कांदळवनालगत भरणी केल्याबाबत...

संदर्भ : १) आपले कार्यालयाकडील पत्र क्र.सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-६०२/२०१९ दि.०९/०९/२०१९ जा.क्र.१०६३४.

२) तहसिलदार कुर्ला यांचेकडील पत्र क्र. तह कुर्ला/जमीन/कावि-९५४/२०१९ दि. ०९.१२.२०१९

मा. महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्र. १ समवेत प्राप्त झालेल्या श्री. नंदकुमार पवार यांनी मौजे चेंबूर ता. कुर्ला सायन-पनवेल हायवे येथे कांदळवनालगत भरणी केल्याबाबत तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचेकडून संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त झालेल्या अहवालानुसार पुढीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

जिल्हाधिकारी, ... जिल्हा यांचे कार्यालय ... DEC 2019

दि.०७/१२/२०१९ रोजी तक्रारदार यांनी दाखविलेल्या जागेची संयुक्त स्थळपाहणी केली असता मौजे चेंबूर ता. कुर्ला येथील सर्वे नं. ३२० पै, न.भू.क्र.६६१ या शासकीय जमिनीवर असलेल्या कांदळवन क्षेत्रात अनधिकृत भराव करुन अंदाजे ३० ते ४० कच्च्या झोपडया बांधल्या असलेबाबत तसेच सदर जागेवर अनधिकृत वाचनालय, गॅरेज असल्याचे नमूद केले आहे. जागेवर अनधिकृत भराव झाल्याने खाडीच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बंद झाला असून नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाअभावी कांदळवनाची झाडे सुकलेल्या अवस्थेत दिसून आली. साचलेल्या पाण्यामुळे देखील कांदळवनाची हानी झालेली आहे. सदर जागेच्या पुर्वेस कांदळवन/ दलदलीचे क्षेत्र, निवासी सोसायट्या व पश्चिमेस घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, उत्तरेस पुर्व द्रुतगती महामार्ग व दक्षिणेस मानखुर्द लिंक रोड व दलदलीचे क्षेत्र असलेचे नमूद केले आहे.

सर्वे नं. ३२० पै चे गाव अभिलेख ७/१२ पाहता कब्जेदार सदरी भारत सरकार (साल्ट पॅन) अशी नोंद आहे. सदरचे क्षेत्र हे साल्ट पॅन विभागाच्या अखत्यारीत येत आल्याने सदर क्षेत्राचे संरक्षण तसेच अनधिकृत झोपड्या व अनधिकृत भराव करणेस प्रतिबंध/ निर्बंध करणे आवश्यक असलेने मा. उपायुक्त

10C

27/12/19 लिपिक
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

(मिठागरे) यांना शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.१९/१२/२०१८ मध्ये

ती कार्यवाही करणेबाबत कळविणेत आहे आहे.

सोबत तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचा संदर्भ क्र. २ येथे नमुद अहवाल, संयुक्त स्थळ पंचनामा व तक्रारदार यांचा जबाब जोडला आहे. प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर

उप विभागीय अधिकारी
पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा

सोबत- पृष्ठांक ०१ ते १०

Scanned by CamScanner

# तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचे कार्यालय

टोपीवाला कॉलेज इमारत, पहिला मजला, सरोजनी नायडू रोड, मुलुंड (प.) मुंबई 400080
फोन. :- 25602386 email- tahsildarkurlaest@gmail.com

क्र.तह/कुर्ला/जमीन/कावि-949/2019 दि.09/12/2019

प्रति,

मा. उपविभागीय अधिकारी,

पुर्व उपनगरे.

OFFICE OF THE SUB-DIVISIONAL OFFICER Eastern Suburban Mumbai Suburban District Inward No. 1598 Date 18/12/2019 Comp. S.D.O. E.S.M.S.D. A.K. N.T.

विषय:- मौजे-चेंबुर ता.कुर्ला सायन- पनवेल हायवे येथे कांदळवनालगत भरणी केल्याबाबत..

संदर्भ:- मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र.सी/ कार्या-2आय /टे-8/कावि-602/2019 दि.09/09/2019.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये श्री. नंदकुमार पवार यांनी मौजे-चेंबुर ता.कुर्ला सायन- पनवेल हायवे येथे कांदळवनालगत भरणी केल्याबाबत तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने स्थळपाहणी करुन चौकशी अहवाल सादर करण्याचे या कार्यालयास निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने मंडळ अधिकारी, चेंबुर, तलाठी चेंबुर, तलाठी तुर्भे, वनपाल कांदळवन, कुर्ला, वनरक्षक कुर्ला व तक्रारदार यांचे सह संयुक्त स्थळपाहणी करुन पुढीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

दि.07/12/2019 रोजी तक्रारदार यांनी दाखविल्याप्रमाणे जागेची संयुक्त स्थळपाहणी केली असता, मौजे-चेंबुर ता.कुर्ला येथील सर्वे नं.320 पै, न.भु.क्र.661 या शासकीय जमिनीवर असलेल्या कांदळवन क्षेत्रात अनधिकृत भराव करुन अंदाजे 30 ते 40 कच्च्या झोपड्या बांधलेल्या आहेत. तसेच सदर जागेवर अनधिकृत वाचनालय, गॅरेज असल्याचे दिसुन आले. जागेवर अनधिकृत भराव झाल्याने खाडीच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बंद झाला असुन नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाअभावी कांदळवनाची झाडे सुकलेल्या अवस्थेत दिसुन आली. साचलेल्या पाण्यामुळे देखील कांदळवनाच्या हानी झालेली आहे. सदर जागेच्या पुर्वेस कांदळवन/ दलदलीचे क्षेत्र, निवासी सोसायट्या व पश्चिमेस घाटकोपर- मानखुर्द लिंक रोड, उत्तरेस पुर्व द्रुतगती महामार्ग व दक्षिणेस मानखुर्द लिंक रोड व दलदलीचे क्षेत्र आहे.

सर्वे नं.320 पै चे गाव अभिलेख 7/12 पाहता कब्जेदार सदरी भारत सरकार (साल्ट पॅन) अशी नोंद आहे. सदरचे क्षेत्र हे साल्ट पॅन विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने सदर क्षेत्राचे संरक्षण तसेच अनधिकृत झोपड्या व अनधिकृत भराव करणेस प्रतिबंध/ निर्बंध करण्यास सदर विभागामार्फत उपाययोजना करण्यात याव्यात असे या



Scanned by CamScanner

कार्यालयाचे मत आहे. त्यानुसार या कार्यालयामार्फत मा.उपायुक्त (मिठागरे), यांना शासन, महसुल व वन विभाग, यांचेकडील शासन निर्णय दि.19/12/2018 अन्वये योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविणेत आले आहे.

सोवत मंडळ अधिकारी, चेंबुर यांचा अहवाल, संयुक्त स्थळपाहणी पंचनामा व तक्रारदार यांच्या जबाबासह प्रस्तुत प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर करण्यात येत आहे.

(संदीप थोरात)
तहसिलदार कुर्ला
(मुलुंड)

Scanned by CamScanner

दि. ०७/१२/२०१९

## जबाब

"मी खालील सही करणार श्री. नंदकुमार पवार, वय वर्षे, राहणार भांडुप (पूर्व) मुंबई.

" कारणे निवारणेबाबत समक्ष जागेवर यामार्फत तहसिल नियंत्रण समिती सदस्य, तहसिल कुर्ला यांचे समक्ष जबाबप्रतिवेदनावर लिहून देतो की, मौजे चेंबुर ता. कुर्ला येथील स.नं. २२० पै न.भू.क्र. ६६७ या जमिन मिळकतीवर असलेल्या कांदळवनाच्या जागेवर अज्ञात इसमांनी मनचिखल भराव टाकून झोपड्या झालेल्या आहेत. तसेच खाडीमधील भरतीचे पाणी मनचिखल भरावामुळे साचून राहिल्याने अंदाजे १५० ते २०० पूर्ण वाढ झालेली कांदळवनाची झाडे वाळून गेलेली आहेत व काही झाडे उन्मळून पडलेली आहेत. तरी मनचिखल भराव व झोपडे निष्कासित करुन भरतीचे, खाडीचे पाणी पूर्ववत वाहते राहिल त्यामुळे कांदळवनाची झाडे पुनश्च पुनर्जिवित होतील. त्यानुसार मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आज दि. ७-१२-२०१९ रोजी जबाब लिहून दिला असे.

वर लिहून दिलेला जबाब खरा असून तो मला वाचून दाखविला, तो बरोबर असे.

समक्ष:

(सही)
तलाठी सजा चेंबुर
दि. ०७.१२.१९

(सही)
(श्री. नंदकुमार पवार)
(07-12-2019)

Scanned by CamScanner

दि. ०७/१२/२०१९

पंचनामा

आम्ही खालील सह्या करणार
तालुका स्तरीय सागर तटीय संनियंत्रण समिती, तहसिल कुर्ला सदस्य आज दि. ०७-१२-२०१९ रोजी समक्ष हजर राहून लिहून देतो की, मौजे- चेंबुर ता. कुर्ला येथील स.नं ३२० चे न.भू.क्र ६६५ या शासकीय जमिनीवर असलेल्या कांदळवन क्षेत्रात अनधिकृत भराव करून झोपड्या बांधलेल्या आहेत तसे सदरहू जागेवर अनधिकृत वाचनालय, गॅरेज असल्याचे दिसून आले. तसेच काही ठिकाणी अनधिकृत भराव झाल्याने खाडीच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बंद झाला असून नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाअभावी कांदळवनाची झाडे सुकलेल्या अवस्थेत दिसून आली तसेच साचलेल्या पाण्यामुळे देखील कांदळवनाच्या झाडांचा र्‍हास झालेला आहे. सदरहू जागेच्या पूर्वेस कांदळवन /दलदलीचे क्षेत्र, निवासी सोसायट्या व पश्चिमेस घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, उत्तरेस पूर्व द्रुतगती महामार्ग व दक्षिणेस मानखुर्द लिंक रोड व दलदलीचे क्षेत्र आहे वरीलप्रमाणे जागेच्या चतुःसिमा आहेत.

या शासकीय जागेवरील अनधिकृत भराव काढून तसेच त्यावरील कच्च्या स्वरूपातील झोपड्या संपुष्टात करित्या निष्कासन करणे जरुरीचे आहे व यापुढे पुन्हा अनधिकृत भराव व अतिक्रमण होऊ नये याकरिता सदर जागेस संरक्षित भिंत उभारणे अत्यंत आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

सदरहू पंचनामा हा तक्रारदार - श्री नंदकुमार पवार व छेडानगर रेसीडेन्स्द्स वेलफेअर असो. यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जागेवरील वस्तुस्थिती व सत्यस्थिती दर्शक स्थळपंचनामा आज दि. ०७-१२-२०१९ रोजी लिहून दिला असे. वर लिहून दिलेला पंचनामा खरा व बरोबर असून भविष्यात तो खोटा आढळल्यास त्यास सर्वस्वी आम्ही जबाबदार राहू.

समक्ष

तलाठी चेंबुर

म.अ. चेंबुर

न.र. कुर्ला

मु.अ.ख.प्र. म.ल.प. मुंबई

तलाठी सजा - तुर्भे

वनपाल ... कुर्ला

Scanned by CamScanner

# तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचे कार्यालय

टोपीवाला कॉलेज इमारत, पहिला मजला, सरोजनी नायडू रोड, मुलुंड (प.) मुंबई 400080
फोन. :- 25602386 email- tahsildarkurlacst@gmail.com

क्र.तह/कुर्ला/जमीन/कावि-954/2019 दि.09/12/2019

प्रति,

मा. उपायुक्त (मिठागरे),

एक्सचेंज बिल्डींग, 4था मजला,

सर शि.रा.मार्ग, बलार्ड इस्टेट,

मुंबई- 400 001

विषय:- मौजे-चेंबुर ता.कुर्ला सायन- पनवेल हायवे येथे कांदळवनालगत भरणी केल्याबाबत..

संदर्भ:- मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र.सी/कार्या-2आय /टे-8/कावि-602/2019 दि.09/09/2019.

उपरोक्त विषयान्वये मौजे चेंबुर, ता.कुर्ला येथील स.नं.320 पैकी या मिळकतीच्या 7/12 कब्जेदार सदरी भारत सरकार अशी नोंद आहे. सदर मिळकतीवरील कांदळवनाची तोड/ अनधिकृतरित्या भरणी चालु असल्याबाबत या कार्यालयास तक्रारी प्राप्त झाल्या आहे. सदर मिळकत आपले ताब्यात असल्याने त्यावर होणारे अतिक्रमण/ भरणी/ कांदळवनाचा ऱ्हास इ.बाबत मा. उच्च न्यायालयाचे मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र.2346/2004 रुपांतरीत जनहित याचिका क्र.87/2006 मध्ये दि.6/10/2005 नुसार दिलेल्या निर्णयास अनुसरुन तसेच शासन निर्णय दि.19/12/2018 नुसार कांदळवनाचा ऱ्हास करणाऱ्या व्यक्तींविरुध्द वा संस्थेविरुध्द कारवाई करणे आवश्यक असल्याने त्यानुसार कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा व या कार्यालयास कळविण्यास विनंती आहे.

सही/-
(संदीप थोरात)
तहसिलदार कुर्ला
(मुलुंड)

प्रत:- मा.उपविभागीय अधिकारी, पुर्व उपनगर यांना माहितीसाठी सविनय सादर.

(संदीप थोरात)
तहसिलदार कुर्ला
(मुलुंड)

D:\LND NEW\Kandalvan\Circle Chembur\Nandkumar Pawar.docx

Scanned by CamScanner